ISSN 2231-1629
Knowledge Resonance

# ''कोरोणा संसर्ग सद्यस्थिती समस्या आणि आव्हान'': एक समाजशास्त्रीय अभ्यास

**डॉ.कालिदास मारुती भांगे**
सहयोगी प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग,
श्री. आसारामजी भांडवलदार महाविद्यालय देवगाव रंगारी ता. कन्नड, जि. औरंगाबाद

**प्रस्ताविक :**

कोरोणा या संसर्गजन्य आजाराने संपूर्ण विश्व ग्रासलेले आहे, त्यामुळे जगाच्या कानाकोपऱ्यातून चिंतेचे आणि दहशतीचे वातावरण निर्माण झालेले दिसून येते. कोरोना विषाणू चा पहिला रुग्ण चीन मधील वुहान या शहरात जानेवारी 2019 मध्ये आढळला आणि त्या शहरात वाऱ्याच्या वेगाने पसरला. परंतु या विषाणूंचा प्रसार रोखण्यात चीन शासन आणि प्रशासन यशस्वी झाले. या संसर्गाचा प्रसार रोखण्यास चीन सरकार यशस्वी झाले. असले तरी हा विषाणू जगाच्या कानाकोपऱ्या पोहोचला. चीनमधील इतर शहरात किंवा प्रांतात पोहोचला नाही, परंतु हा विषाणू जगाच्या कानाकोपऱ्यात कसा पोहोचला? की पोहोचवला? की हा विषाणू खरोखरच निसर्गनिर्मित आहे? की मानवनिर्मित आहे?, किंवा हे जैविक युद्ध तर नाही ना? सध्याच्या कालखंडात भारत, मलेशिया, जपान, नेपाळ, इत्यादी शेजारी राष्ट्रांशी ज्याप्रमाणे चीन वागत आहे. त्यावरुन निश्चितच हे जैविक युद्ध असावे असा कयास जगभरातील मान्यवर काढताना आढळून येत आहेत. यामध्ये प्रामुख्याने अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी कित्येक वेळेस याचा पुनरुच्चार केलेला आहे, तर केंद्रीय मंत्री मा. नितिन गडकरी यांनीही हा विषाणू मानवनिर्मितच आहे असे विधान केलेले आहे. यामुळे निश्चितच हा विषाणू जैविक युद्ध खेळण्याची चीन ची निती असावी, जगावर स्वतःचे वर्चस्व सिद्ध करण्याकरिता आणि आपली दहशत निर्माण करण्याकरिता खेळले जैविक युद्धच असावे, असा निष्कर्ष विचारवंत आणि मान्यवर करताना आढळून येतात. जगामध्ये ज्या काही घटना घडतात, त्यामध्ये ज्या काही घडामोडी घडताना आढळून येतात, त्यामध्ये हा विषाणू निसर्गनिर्मित असो किंवा मानवनिर्मित असो, जगभरातील जे काही निष्पाप लोकांचे बळी जात आहेत. त्याचबरोबर कष्टकरी, शेतकरी, कामगार, यांना समस्यांना सामोरे जावे लागत आहे, त्याचे चित्र विदारक आणि मन विषण्ण करणारे आहे.

संपूर्ण जगात कोरोणाने थैमान घातलेले आहे, चीनमधून पसरलेल्या कोरोनामुळे अनेक देशांमध्ये भीषण परिस्थिती निर्माण झालेली आहे. जगातील कोरोणाच्या रुग्णांची संख्या एक कोटीच्या पुढे गेली असून मृतांचा आकडा पाच लाखापेक्षा अधिक आहे संशोधकांच्या म्हणण्यानुसार कोरोणाचे नवे रुग्ण वेगाने वाढत आहे ड्युक युनिव्हर्सिटीच्या डेव्हीड मोंटेफोर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या विषाणुचे प्रयोगशाळेत परीक्षण केलेले आहे, त्यानंतर त्यांनी सांगितले की कोरोणा विषाणूचा जी फॉर्म हा डी फॉर्मच्या तुलनेत अधिक संसर्गजन्य होत आहे. आता आमच्याकडे संशोधनातून मिळालेले पुरावे आहेत त्यांच्या निष्कर्षानुसार कोरोणा विषाणूचे नवे रुग्ण त्याच्या मूळ रुग्ण पेक्षा तीन ते नऊ पट अधिक संक्रमणशील असल्याचे दिसून येते, त्यांनी जी फोर असे शास्त्रीय नाव दिलेले आहे. या दोन्हींची तुलना केल्यानंतर कोरोणाची दोन रुपये ओळखण्यात मदत होते 1 मार्च 2020 च्या काळात जी-614 च्या बाहेर दुर्मीळ होते मात्र मार्च अखेरीस घरा-घरात शिरले तसेच डी - 6144 साथीचे कारण ठरले इंग्लंडमधील नॉटिंगहॅम भागात तसेच वॉशिंग्टनमध्ये जी-614 पुन्हा दिसून आले.

अमेरिकेच्या मेरीलँड विद्यापीठाच्या हॉस्पिटल मधील साथरोग विभागाचे प्रमुख आणि कोरोणावर उपचार करणारे डॉ. फईम युनूस यांनी जगाला इशारा दिला आहे, त्यांनी ट्विट करुन कोरोणाशी संबंधित काही गोष्टी सांगितलेल्या आहेत, त्यामध्ये युनूस म्हणतात की, मित्रांनो सत्याचा स्वीकार करा हेच खोट्या आशेपेक्षा खूप भल्याचे आहे. मी सांगू इच्छितो की कोरोणा संबंधी खरी माहिती शेअर करत आहे. कारण कोरोणावर मात करण्यासाठी आपण एकत्र होऊन योजना बनवू शकू, तयारी करु शकू, एकमेकांची मदत करुया. त्याचबरोबर अमेरिकेतील प्रसिद्ध वैद्यकीय तज्ञ यांनी अमेरिकेतील कोरोणा रुग्णांच्या संख्येवरही मत मांडले आहे. अमेरिकेमध्ये 25 लाखाहून अधिक कोरोणाचे रुग्ण सापडले आहेत. अमेरिकेची प्रमुख आरोग्य संस्था सीडीसी नुसार अमेरिकेची खरी संख्या ही दहा पटीने अधिक असू शकते, पाकिस्ताने अमेरिकेपेक्षा पंधरा पटीने (प्रति दहा लाख) लोक कमी चाचण्या घेतल्या आहेत, मात्र तेथे दोन लाख रुग्ण सापडले आहेत म्हणजे कल्पना करा पाकिस्तानात रुग्णांची संख्या खरी किती असेल, असेही त्यांनी म्हंटले आहे. कोरोणा ही साथ जवळपास वर्षे ते दोन वर्षापर्यंत जगामध्ये राहू शकते, असे काही तज्ञांनी म्हटलेले आहे म्हणूनच जागतिक आरोग्य संघटनेनेही कोरोणा सह जगायला शिका!, असे आव्हान केले आहे म्हणजेच जरी लस सापडली तरीही तिचे उत्पादन आणि जगभरात वाटप होण्यासाठी कमीत कमी एक वर्ष लागणार आहे, हार्ड इम्युनिटी खूप दूर आहे, महामारीने वेग पकडला आहे, यामुळे लस आल्यानंतरही साधारणपणे वर्षभराने कोरोनाचा कहर कमी करुन दिलासा मिळण्यासाठी दोन वर्षे जाणार आहेत, या हिशोबानेच योजना बनवायला हवी असे फहीम युनूस यांनी सांगितले आहे. कोरोणा कमी की काय  म्हणून चीन मध्ये एका नवीन व्हायरसचा रुग्ण आढळलेला आहे. विषाणूला Covid-19 असे शास्त्रीय नाव दिलं आहे हा विषाणू डुकरांमध्ये सापडला आहे हा विषाणू डुकरांमधून माणसाच्या शरीरात प्रवेश करु शकतो अशी माहिती समोर आलेली आहे.

कोरोणा विषाणूचा संसर्ग टाळण्यासाठी चीनने लॉकडाऊन अवलंबले त्याच प्रमाणे जगभरातील सर्व देशांनी कमी - अधिक प्रमाणात लॉकडाऊन लावण्याचा प्रयत्न केला, त्या माध्यमातून दळणवळणाची साधने, सार्वजनिक ठीकाणे, कंपन्या बंद करण्यात आल्या, कारखाने बंद करण्यात आले, कार्यालये बंद करण्यात आले आणि त्यामुळे लोकं एकमेकापासून आपोआप दूर राहिल्याने संसर्ग कमी झालेला दिसून येतो. परंतु देशातील महाराष्ट्र, दिल्ली, गुजरात, उत्तर प्रदेश, कर्नाटक या मोठी लोकसंख्या असलेल्या राज्यांमध्ये कोरोणाचा संसर्ग मोठ्या प्रमाणात होत होता त्यातील महाराष्ट्रामध्ये मुंबई, पुणे, औरंगाबाद, मालेगाव, ठाणे, नाशिक यासारख्या शहरात सुरुवातीच्या काळात कोरोणा संसर्ग वेगाने वाढला लॉकडाउन एक - दोन - तीन संपल्यानंतर मुंबई, पुणे, औरंगाबाद, मालेगाव, नाशिक, ठाणे, शहरातून मोठ्या प्रमाणात स्थलांतर झाले आणि त्याचा परिणाम म्हणून महाराष्ट्रातील गाव - वाडी - वस्ती, जिल्ह्याच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात संसर्ग वाढत गेला आणि आज मितिला देशाच्या तुलनेमध्ये सर्वाधिक कोरोणा रुग्णांची संख्या असलेले राज्य म्हणून महाराष्ट्र अशी नोंद झाली. ही काही गौरवाची बाब नाही, आज महाराष्ट्रात 2 लाखापेक्षा अधिक संख्या कोरोणा रुग्णांची आहे, याची कारणमीमांसा करणे गरजेचे आहे. लॉकडाऊन खुले केल्यानंतर औरंगाबाद जिल्ह्यातील वाळुज -पंढरपूर आणि शेंद्रा एम आय डीसी येथील कंपन्या सुद्ध करण्यात आल्या. या कंपनीतील कामगार पंढरपूर, शेंद्रा एमआयडीसी या भागात एका-एका दिवशी शंभर ते दीडशे रुग्ण पॉझिटिव आले आणि औरंगाबाद मध्ये सरासरी शहरी आणि ग्रामीण भाग मिळून तीनशे पर्यंत आकडा एका दिवसात रुग्णांचा वाढत चालला म्हणजेच महाराष्ट्रात मुंबई, पुणे नंतर औरंगाबादच नंबर लागतोय असे दिसून येते

कोरोणा विषाणूचा संसर्ग कमी व्हावा किंवा तो होऊच नये यासाठी भारत सरकारने जी टाळेबंदी लावली होती त्यामध्ये पर्यटन स्थळे बंद करण्यात आली तसेच स्थानिक

स्तरापर्यंत कोरोणाने जी दहशत निर्माण केली होती ती कमी करण्यासाठी भारत सरकारने आणि राज्य सरकारने कडक पावले उचलत जीवनावश्यक वस्तूंची दुकाने सोडून बाकी सर्व शाळा - महाविद्यालये, हॉटेल्स दारुची दुकाने, सार्वजनिक ठिकाणे, विवाह सोहळे, मंगल कार्यालये, मंदिरे इत्यादी बंद करण्यात आली होती, कारण या ठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी गर्दी असते आणि त्यामुळे या विषाणूंचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढू शकतो. म्हणून अंतिम संस्काराच्या वेळीही 15 ते 20 लोकांपेक्षा अधिक लोकांना बंदी करण्यात आली सर्वत्र जमावबंदी कायदा कलम 144 लागू करण्यात आले होते. त्यामध्ये कोरोणाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता या क्षेत्रात काम करणाऱ्या डॉक्टर, परिचारिका, सफाई कामगार व पोलीस यंत्रणा यंत्रणेतील भीतीने काम सोडून गेल्याचे उदाहरण समोर आलेले नाही. खरंच त्यांच्या कुटुंबीयांना आणि कोरोणा योद्धयांना सलाम करायला हवा माणूस अंथरुणाला खिळला तर एखादा आजार झाला तर रक्ताचे नाते ही दूर जाते परंतु रुग्णालयात कोणतेही नाते नसताना कोरोणा योद्धे कोरोणा ग्रस्तांची सर्व सुश्रुषा करुन त्याला दुरुस्त करण्याचे काम करताना आढळून येतात. भारतामध्ये सुरुवातीच्या काळात या कोरोणा योध्यांना सुरक्षित किटही नव्हत्या. परंतु नंतरच्या कालखंडात मात्र या किट्स उपलब्ध करुन दिल्या गेल्या तसेच पोलिस यंत्रणा दिवस - रात्र रस्त्यावर काम करत आहे. त्यांना ऊन-वारा - पाऊस - वादळ असो की एखादा सण असो वर्दीतील पोलिस सातत्याने देशाच्या संरक्षणासाङ्गी तत्पर असतात ते बंदोबस्त करत असतात. तरीही लोकांची मानसिकता स्वतःच्या इच्छेने आपण स्वतःहुन संसर्गापासून दूर राहू शकतो अशी मानसिकता तयार झालेली नाही. ही दुर्दैवी बाब आहे म्हणून राज्यातील विशेषता मुंबईतील पोलिस सर्वाधिक बळी गेलेले दिसुन येतात. देशातील राज्यातील लोकांच्या वागण्यामुळे त्रास होतो त्यामुळे त्यांचे जीवनही धोक्यात येते आहे. धोका वाढतो वाहतूक शाखेचे सर्व कर्मचारी सकाळपासून ते संध्याकाळपर्यंत रस्त्यावर तैनात असतात त्यांना विनाकारण रस्त्यावर फिरनार्यावर कारवाईचे आदेश दिले होते. तरीही काहीही काम नसताना रस्त्यावरुन फेरफटका मारणाऱ्यांची संख्या मोठी होती त्यामुळे त्यांना शिक्षा करुन फटके देत होते, हात जोडत फुलांचे गुच्छ देऊन स्वागत करत अशाप्रकारे वेगवेगळ्या तऱ्हेने लोकांना घरांमध्ये थांबण्यासाङ्गी विनंती केली तरीही या लोकांची मानसिकता घरामध्ये बसण्याची नव्हती न राहिल्याने या आजाराचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढत गेलेला आहे. त्या नंतरच्या कालखंडामध्ये दारुची दुकाने सुरु केल्यामुळे दोन - दोन, तीन - तीन किलोमीटरपर्यंत या दारु पिणार शौकिनांची गर्दी झालेली आदेशाने पाहिलेली आहे म्हणजेच दारुची दुकाने खुली केली म्हणजे कोरोणा गेला असेच मानसिकता या देशातील राज्यातील लोकांची झालेली होती. परंतु कोरोणाने सूट दिलेली नव्हती लोकांची मानसिकता लोकांच्या मागण्या आणि या मुळे देशाचा-राज्याचा महसूल वाढण्याकरिता म्हणून नव्हे, तर लोकांची गरज आणि मानसिकता पाहून दारुची दुकाने खुली करण्यात आलेली होती. त्यामुळे रुग्णांची संख्या, रस्त्यावरील गर्दी आणि गर्दीत जाणारे मध्यपी त्यामध्ये कुटुंबातील सदस्य यांचा ही मोठ्या प्रमाणात यांच्यावरही कोरोणाचा प्रादुर्भाव झालेला आढळून येतो.

सद्यपरिस्थितीत कोरोणाचा वाढता प्रार्दुभाव पाहता आरोग्य विषयक नियम सर्व दुकानदारांनी पाळले पाहिजेत अन्यथा दुकाने सुरु ठेवणे धोकादायक ठरु शकते. गर्दी आटोक्यात आणताना पोलिसांची दमछाक होते आहे, असे दिसून येते. या गर्दीमुळे कोणालाही सामाजिक अंतर पाळण्याचे भान राहत नाही, त्यामुळे कोरोणाचा संसर्ग वेगाने फैलावत आहे. त्याचा ताण आरोग्य यंत्रणा, पोलीस यंत्रणा आणि प्रशासकीय यंत्रणा यावर येतो आहे.कोरोणा संसर्गा नंतर मोठ-मोठ्या महानगरातील कामगार सध्या बेरोजगार झालेले आहेत. यामध्ये सुशिक्षित, अशिक्षित, कुशल - अकुशल, शेतमजूर, घरकामगार, घरकाम करणाऱ्या स्त्रियां, दुकानावर कामगार काम करणारे कामगार, हमाल, त्यांच्याप्रमाणेच अमेरिका, इराण, इराक, दुबई, सिंगापूर, चीन इत्यादी

देशांमधून आलेले आणि विविध क्षेत्रातील तज्ञ किंवा विविध क्षेत्रात काम करणारे तरुण - तरुणींचा याङ्गिकाणी समावेश करता येईल. या तरुणांच्या पुढे सध्याच्या कालखंडात भविष्याचे वेध घेता येत नाहीत, कारण कोरोणा स्थिती नंतर काय स्थिती असेल? याचा अंदाज कोणालाही बांधणे शक्य नाही, म्हणून सध्या त्यांच्यामध्येही मानसिक दडपण / तणावाचे वातावरण दिसून येते. राज्य आणि केंद्र सरकारने टप्प्याने लॉकडाऊन खुले केले, त्यामध्ये कंपन्या कामगारांचे क्षेत्रे, सलून, छोटे - मोठे, दारुची दुकाने चालू केल्यामुळे मागील तीन महिन्यापासून घरांमध्ये असलेले कामगार मोठ्या उत्साहाने आपल्या कामाच्या ठिकाणी हजर झाले परंतु त्यांच्याकडून, कंपनी मालकाकडूनही आणि व्यवस्थापनाकडूनही सामाजिक अंतर ठेवण्याचे भान विसरले आणि त्यानंतरच्या कालखंडात मोठ्या प्रमाणात रुग्णांची संख्या वाढत चालली. यामध्ये औरंगाबाद, पुणे, मुंबई, नाशिक आणि नागपूर या ठिकाणी छोटे-मोठे उद्योग चालू केल्या कारणाने कामगार आणि त्यांचे कुटुंबीय किंवा त्यांच्या संपर्कात येणारे इतर लोकांमध्येही कोरोणा संसर्गाचे प्रमाण वेगाने वाढताना आढळून येते. औरंगाबाद मध्ये लॉकडाऊन खुले केल्यानंतर आणि कंपन्या चालू कंपन्या सुरु करण्यात आलेल्या आहेत. तसेच मंदिरे खुली केली, विक्रेते व्यापारी यांनी आपली दुकाने चालू ठेवली त्याचा परिणाम, महाराष्ट्रातील इतर शहराप्रमाणेच औरंगाबाद शहरातही रुग्णांचा आकडा वेगाने वाढताना आढळून येत आहे

कोरोणामुळे देशातील आर्थिक व्यवसायाची परिस्थिती बिकट झालेली आहे. कोरोणाचा प्रसार थांबविण्यासाठी लागू करण्यात आलेल्या लॉकडाऊनमुळे आर्थिक संकटाने आपले डोके वर काढलेले आहे, त्यामुळे लोकांचा जीव वाचवण्यासाठी व अर्थव्यवस्था स्थिर ठेवणे अशा दोन्ही गोष्टीवर राज्य आणि केंद्र सरकारची चिंता वाढलेली दिसून येते. याचा परिणाम इतर व्यवसाय बरोबरच हॉटेल व्यवसायाला देखील मोठ्या प्रमाणात परिणाम झालेला आहे. अनेक शहरातील मोठ्या हॉटेल बंद पडलेली आहेत, अलीकडेच महाराष्ट्र शासनाने हॉटेलच्या खोल्या 30 टक्के सुरु करण्याचा निर्णय घेतलेला आहे तर 70 टक्के मोठे हॉटेल्सच्या रुम्स विलगिकरण कक्ष करण्यासाठी वापरण्याचे नियोजन स्थानिक प्रशासन आणि महानगरपालिका यांच्यावर सोडलेले आहे. सुरुवातीच्या काळात हॉटेल्स बंद असल्या कारणाने हॉटेल व्यावसायिक तसेच हॉटेल मध्ये काम करणारे कामगार आणि हॉटेल व्यवसायावर अवलंबून असणारे अन्य व्यावसायिक देखील अडचणीत आलेले आहेत जवळपास हॉटेल व्यवसायावर 20 ते 22 लाखांपेक्षा अधिक लोक महाराष्ट्रात अवलंबून असतात आणि त्यामुळे त्यांच्यावर कोरोणामुळे हॉटेल्स बंद केल्याने बेकारीची कुऱ्हाड कोसळली आहे. या व्यवसायातही अशीच स्थिती राहिली तर येत्या काही दिवसात बरेच हॉटेल व्यावसायीक आपला व्यवसाय सोडून इतर व्यवसायकडे वळण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सर्व व्यवसाय ठप्प होताना दिसुन येत आहेत. त्याचबरोबर याचा परिणाम पर्यटन क्षेत्रावरही आणि रोजगाराचा क्षेत्रावरही होऊ शकतो. कोरोणाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे प्रत्येक क्षेत्रावर आघात केलेला आहे रोजंदारीवर काम करणारे, मजूर घरकाम करणारे, शेतीत काम करणारे, तसेच फेरीवाले त्याच बरोबर फुटपाथवर आपला व्यवसाय करणारे यांच्यावर या संकटामध्ये मोठ्या प्रमाणात दूरगामी परिणाम होताना आढळून येत आहे. लॉकडाऊनच्या परिस्थितीत शिक्षणावरही याचे दूरगामी परिणाम होत आहेत, महाराष्ट्र सरकारने उच्च शिक्षणामध्ये ऑनलाइन शिक्षण पद्धती चालू करण्याचा जो मानस व्यक्त केलेला आहे किंवा त्या दिशेने प्रयत्न केलेले दिसतात, परंतु यामध्ये केवळ दहा टक्के विद्यार्थी तेथे असणाऱ्या पायाभूत सुविधा मुळे शिक्षण घेऊ शकतात बाकी नव्वद टक्के विद्यार्थ्यांना हे अँड्रॉइड फोन, इंटरनेट सुविधा त्याच बरोबर फोनवर बघण्याची मानसिकता आणि प्रत्यक्ष मिळणारे शिक्षण यांच्यामध्ये फरक आहे आणि म्हणूनच ऑनलाईन शिक्षण पद्धती ही सर्वसामान्य

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

गरीब होतकरू ग्रामीण भागातील विद्यार्थी यांच्यासाठी कुचकामी आहे त्यामुळेच शिक्षणातील तरीही मोठ्या प्रमाणात वाढू शकते आणि म्हणून ऑनलाइन शिक्षण पद्धती विषयी योग्य .दृष्टिकोन योग्य ठेवून शिक्षण ऑफलाईन असले पाहिजे जेणकरुन केवळ दहा टक्के विद्यार्थ्यांकडे आई - वडील लक्ष देऊ शकतात, मात्र 90 टक्के विद्यार्थ्याकडे सुविधा उपलब्ध होऊ शकत नाहीत आणि त्यांच्या आई वडील या सुविधा पुरवू शकत नाहीत त्यामुळे निरक्षरतेचे प्रमाण वाढू शकते त्याचबरोबर मुलांच्या डोळ्यावर, कानावर ही सातत्याने विपरीत परिणाम होऊ शकतो, त्यामुळे काही विद्यार्थी मानसिक आजाराने ही त्रस्त होतात तर डोळ्यांची आजारही मोठ्याा प्रमाणात वाढताना आढळून येत आहे. म्हणून लॉकडाऊनच्या काळामध्ये शिक्षण पद्धतीत जे अमुलाग्र बदल करण्याचे स्वप्न पाहत होते त्यांना आयतेच कोलीत मिळाले असले तरी सर्व समाज घटकातील पालक विद्यार्थी यांनी या ऑनलाइन शिक्षण पद्धतीस विरोध करणे आवश्यक आहे. कारण बहुजनातील गरीब, शेतकरी, मंजुरी करणारे, कष्टकरी व कामगार यांचे विद्यार्थी या पद्धतीने शिक्षण घेऊ शकत नाहीत. त्यांना या सुविधा उपलब्ध होऊ शकत नाहीत, त्यामुळे ऑफलाइन शिक्षण पद्धती आवश्यक आहे प्रश्न विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीचा आपण अधिकचे तासिका घेऊन, रविवारच्या सुट्टया रद्द करुन, दिवाळी सुट्टी आणि उन्हाळी सुट्टया रद्द करुन तो अभ्यासक्रम पूर्ण करु शकतो, याचा एक शिक्षक म्हणून आपण भूमिका घेतली पाहिजे.

भारत मोठी लोकसंख्या असलेला देश आहे. भारतातील काही मोठ्या शहरांमध्ये झोपडपट्टीत राहणाऱ्याची संख्या अधिक असल्याने यासारख्या शहरात महामारीने उग्ररूप धारण केले होते, त्यामध्ये प्रामुख्याने मुंबई, कोलकत्ता, दिल्ली यासारख्या मोठ्या शहरातून झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांची संख्या अधिक आहे, त्यामध्ये कोरोणाचा संसर्ग वेगाने वाढला आणि यातून झोपडपट्टीतच नाही तर अतिश्रीमंत घरातही कोरोणाचा संसर्ग पोहोचलेला दिसून येतो. त्यातून बाहेर येण्यासाठी राजा ते रंक या सर्वांची जबाबदारी असल्याकारणाने सर्वांनी संसर्ग रोखण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार यांनी दिलेल्या सूचनांचे पालन करणे, तसेच डब्ल्यू एच ओने केलेल्या निर्देशांचे ही पालन करणे आणि कोरोणावर मात करणे हेच आपल्या हातात आहे. उपरोक्त निर्देशित केल्याप्रमाणे कोरणा हा संसर्ग एक ते दोन वर्षापर्यंत राहू शकतो, म्हणून आपण आपली, स्वतःची काळजी घेणे आणि आपल्या संपर्कात येणाऱ्या प्रत्येक नागरिकांची काळजी घेणे ही आपली जबाबदारी आहे. त्यानंतर या देशांमध्ये काय परिस्थिती असेल याविषयी काही निष्कर्ष काढण्यात आले आहेत, त्यांचा उल्लेख पुढीलप्रमाणे करता येईल.

**लॉकडाऊन नंतर समस्या व उपाय :-**

1) कोरोणामुळे अनेक उद्योग धंद्यातील स्थायी आणि अस्थायी रोजगाराच्या संधी जाऊ शकतात.

2) कोरोणामुळे अनेक व्यवसाय अडचणीत येऊ शकतात आणि नफा कमी होऊ शकतो.

3) एका नोकरीतून दुसरी नोकरी शोधणे कठीन जाईल.

4) यामध्ये शासन काहीही करु शकणार नाही.

5) कोरोणा नंतर जागतिक घडामोडीचाही परिणाम येथील छोटे-मोठ्या व्यवसायावर होऊ शकतो.

6) आपले उत्पादन घटल्यामुळे त्याचा परिणाम राणी महाराणी मनावर होऊ शकतो.

7) कोरोणाचा प्रादुर्भाव वाढत गेल्यास आणि रोजगाराची संधी उपलब्ध नसल्यास उपासमारीची संख्या अधिक होऊ शकते.

8) शिक्षणावरही त्याचा परिणाम होऊ शकतो.

**लॉकडाऊन खुले केल्यानंतर ज्या समस्या निर्माण होतील त्यावर उपाययोजना म्हणून काही मुद्दे या ठिकाणी**

**सुचना म्हणून करता येतील, त्याचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.**

1) कोरोणा च्या स्थितीनंतर कोणत्याही परिस्थितीला संयमाने तोंड देणे आवश्यक आहे.

2) कोणतेही काम करण्याची तमा न बाळगणे किंवा लाज न बाळगणे तरच आपण व्यवस्थित राहू शकू.

3) अनावश्यक खर्च टाळून दैनंदिन खर्च कमी करण्याचा प्रयत्न करावा, जेणेकरून आपली आर्थिक तरतूद योग्य प्रमाणात करु शकू.

4) समारंभ किंवा काही खर्चाचे समारंभ टाळणे, तसेच ते कमी खर्चिक कसे होतील याची काळजी घेणे.

5) चैनीच्या वस्तू वरील खर्च कमी करणे आणि आहे त्या साधनांमध्ये आपली उपजीविका करणे महत्त्वाचे आहे.

कोणत्याही संकट काळात समाजात एकोपा, कुटुंबात एकोपा आणि राष्ट्रीय स्तरावरही एकसंघ असणे त्या राष्ट्राचे प्रदेश कुटूंबाचे समूहाचे समूहाच्या हिताचे असते म्हणून अशा या जागतिक संकटकाळी या देशातील राज्य सरकार केंद्र सरकार आणि या देशातील नागरिक, तळागाळातील नागरिक, अतिश्रीमंत, व्यवसायिक, उद्योगपती, नोकरदार, राजकारणी या सर्वांनी एकत्र येऊन एक दुसऱ्याच्या हातात हात देऊन सहकार्य करुन एक दुसऱ्याला आधार देणे आणि या संकटातून सहीसलामत बाहेर पडणे हेच राष्ट्राच्या हिताचे आहे.

**संदर्भः**


*1) दैनिक वृत्तपत्र तरुण भारत, 23 मे 2020.*

*2) दैनिक वृत्तपत्र सकाळ, 10 व 17 मे 2020.*

*3) दैनिक वृत्तपत्र लोकमत, बारावी 21 मे 2020.*

*4) दैनिक वृत्तपत्र लोकसत्ता, 5 जून 2020.*

*5) दैनिक वृत्तपत्र पुण्यनगरी, 5 जुनं 2020.*

*6) दैनिक वृत्तपत्र लोकमत, 7 जून 2020.*

*7) दैनिक वृत्तपत्र सकाळ, चार जुलै 2020.*